# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३०/०९/१७
## दि.२९/०९/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३८२/१७,भादविक ३९४ ३८६ ५०४ ३४ |
| **फिर्यादी** | अविनाश बनसोडे,वय १८ वर्षे,रा.आंबेगांव खुर्द,पुणे |
| **आरोपी** | १.प्रमोद ऊर्फ अण्णा शेलार, २.टिक्या शेलार व इतर ३ (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/११/२०१७ रोजी १३/०० वा.चे सुमारास वेगा सेंटर जवळ,शंकरशेठ रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे इसम नामे प्रतिक यादव यांचे नाष्टयाच्या हातगाडीवर काम करीत असुन, अ.क्र.१ याने सदर ठिकाणी येवुन फिर्यादी व प्रतिक यादव यांना नमुद ठिकाणी हातगाडी लावण्यासाठी ५ हजार रु.ची खंडणी मागितली व पैसे न दिल्याने अ.क्र.२ याने इतर ३ इसमांसह नमुद ठिकाणी येवुन फिर्यादीस शिवीगाळ करुन,जिवे मारण्याची धमकी देवुन बांबुने हाता-पायावर,पाठीवर,मानेवर मारुन जखमी करुन,फिर्यादीचे खिशातील २ हजार ३००/- रुपये रोख व मोबाईल जबरदस्तीने काढुन घेतला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मोरे ९५९४९६२५३९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ८७४/१७,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२४,३२३ |
| **फिर्यादी** | एक पुरुष,वय ६५ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | १)सुरजसिंग किसमसिंग बावरी,वय ४५ वर्षे,रा.सर्व्हे नं.१० अशोकनगर मांगिरबाबा चौक येरवडा, पुणे २)सतपालसिंग सुरजसिंग बावरी,वय १८ वर्षे,रा.सदर ३)चंदनसिंग सुरजसिंग बावरी, ४)शक्तीसिंग सुरजसिंग बावरी, ५)बंधनकौर चंदनसिंग बावरी, ६)गितकौर सुरजसिंग बावरी, रा सर्व सदर (अ.क्र.१ व २ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/११/२०१७ रोजी रात्रौ २१/०० वा.चे सुमारास सर्व्हे नं.१० अशोकनगर मांगिरबाबा चौक येरवडा, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे घरासमोर आले असता फिर्यादी यांचा लहाण भाऊ नामे-सुरजसिंग किसनसिंग बावरी, व इतर यातील नमुद इसम फिर्यादी यांचे घरी येवुन शक्तीसिंग बावरी याचे कोर्टातील केसकामी पैशाची मागणी केली असता, फिर्यादी यांनी ते देण्यास नकार देताच त्यानी फिर्यादी व त्यांचा मुलगा राजुसिंग बावरी व पत्नी कला कौर बावरी याना बांबुने,लाकडी धोपाटण्याने व लोखंडी पाईपने व हाताने मारहाण करुन जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस डी दराडे ९४२०६६७७८९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवड पो स्टे ८७५/१७,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२४,३२३ |
| **फिर्यादी** | सतपालसिंग बावरी, वय १८ वर्षे, रा.येरवडा, पुणे |
| **आरोपी** | १)मलिंदर सिंग लक्ष्मण सिंग बावरी, रा स नं १० अशोकनगर मांगिरबाबा चौक येरवडा पुणे २) एक पुरुष,वय ६५ वर्षे, ३) मदनसिंग लक्ष्मण सिंग बावरी रा सदर ४) राजुसिंग लक्ष्मणसिंग बावरी,वय ३६ वर्षे, ५) सागरसिंग लक्ष्मणसिंग बावरी रा सदर ६) आकाशसिंग लक्ष्मणसिंग बावरी रा सदर ७) अमनसिंग राजुसिंग बावरी ८) कुंदनसिंग लक्ष्मणसिंग बावरी ९) कला कौर लक्ष्मणसिंग बावरी रा सदर १०) गुड्डी कौर राजुसिंग बावरी सर्व रा. सर्व्हे नं.१० अशोकनगर मांगिरबाबा चौक येरवडा, पुणे (अ.क्र.२ व ४ अटक) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/११/२०१७ रोजी रात्रौ २१/०० वा.चे सुमारास सर्व्हे नं.१० अशोकनगर मांगिरबाबा चौक येरवडा, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे वडील यांना काही एक कारण नसताना वडीलांना शिवीगाळ करू लागले त्यावेळी फिर्यादी व त्यांची आई भांडणे सोड़वण्यासाठी मध्ये गेले असता, अ.क्र.२ याने त्याचे हातातील तलवार फिर्यादी यांचे डोक्यात उजव्या कपाळावर मारुन जखमी केले तसेच फिर्यादी यांची आई गिता कौर बावरी ही भांडणे सोडवण्यास आली असता तिलाही कला कौर बावरी हिने कोयत्यासारख्या हत्याराने मारुन जखमी केले तसेच सागरसिंग बावरी , आकाशसिंग बावरी , अमनसिंग बावरी गुड्डी कौर बावरी यांनी हाताने मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस डी मारोडे ९६८९३१५०२० |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ६७७/१७,भादविक ४०६,४२७,४०९,५०६,३४ |
| **फिर्यादी** | वतन पठाण,वय ४५ वर्षे,रा.शिवाईनगर ठाणे पश्चिम |
| **आरोपी** | धनराज डेटाकॉम प्रा. लि.व स्पेस कम्युनिकेशन चे संचालक १) धनाजी रामचंद्र शिंदे. २)अजय अहीरेकर ३)कालीदास गोळे व इतर संचालक /भागीदार ऑफिस पत्ते धनराज डेटाकॉम प्रा. लि, शॉप नं १, निखील रेसीडेंन्सी, फ्लॅट नं एल बी १२, माता अमृतानंदमयी मठाजवळ, यमुनानगर, निगडी, पुणे. व स्पेस कम्युनिकेशन, प्लॉट नं २३, से. नं. २१, यमुनानगर, निगडी, पुणे. (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | जुन २०१३ पासुन नोव्हेंबर २०१६ पर्यंत यमुनानगर निगडी,पुणे या भागात |
| **तपशिल** | वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी,फिर्यादी यांचे हॅथवे केबल अँन्ड डेटाकॉम लि. (एच.सी.डी.एल.) ने सन २००६ मधे पिंपरी चिंचवडमधे केबल टिव्ही व्यवसाय व २०१३ मधे इंटरनेटचा व्यवसाय चालु केल्यानंतर धनराज डेटाकॉम प्रा.लि,कंपनी व स्पेस कम्युनिकेशन, यमुनानगर, निगडी,पुणे या पार्टनरशिप फर्मला डिस्ट्रीब्युटर्स म्हणून नेमले. डिस्ट्रीब्युटर्स म्हणून हॅथवे कंपनी वरील दोघांनाही वेगवेगळे कमीशन व कॅरेज फीज देत आली आहे. जानेवारी २०१३ पासुन नोव्हेंबर २०१६ पर्यंत वर नमुद डिस्ट्रीब्युटर्सकडे दिलेल्या सेटटॉप बॉक्स पैकी एकुण ४४,५४४ सेटटॉप बॉक्स मार्केटमधुन बदललेले गेले किंवा निघुन गेल्यामुळे डिॲक्टीवेट करण्यात आलेले आहेत. परंतु हे डिॲक्टीवेट केलेले ४४,५४४ सेटटॉप बॉक्स डिस्ट्रीब्युटर्सनी अद्याप पर्यंत कंपनीकडे परत केलेल नाहीत. वर नमुद डिस्ट्रीब्युटर्सनी नोव्हेंबर २०१६ मध्ये बी.आर.डी.एस नावाच्या दुस-या केबल कंपनीबरोबर काम सुरू केले असुन पिंपरी चिंचवड येथे स्वताचे कंट्रोलरूम सुरू केले व हॅथवेचे सेटटॉप बॉक्स बदलुन तेथे स्वतःचे सेटटॉप बॉक्स लावले. नोव्हेंबर २०१६ पासुन आजतागायत त्यांनी हॅथवेचे अंदाजे १५,००० सेटटॉप बॉक्स बदलुन स्वतःचे सेटटॉप बॉक्स लावलेले आहेत. हॅथवेचे सेटटॉप बॉक्स डिस्ट्रीब्युटर्सनी ग्राहकांकडुन काढुन स्वतःकडे ठेवले आहेत. तरी फिर्यादींची हॅथवे डिजीटल प्रा. लि. (एच.डी.पी.एल.) ने पुरवठादार या व्यापारी नात्याने विश्वासाने धनराज डेटाकॉम प्रा.लि व स्पेस कम्युनिकेशन या कंपनीस व्यवसाय करणेसाठी विश्वासाने ५९,५४४ सेटटॉप बॉक्स (किं. रू.९,५२,७०,४००/-) वापरावयास दिले होते ते सेटटॉप बॉक्स परत कंपनीस न देता त्यांची परस्पर विल्हेवाट लावुन कंपनीचा अन्यायाने विश्वासघात करून स्वतःच्या अर्थिक फायदयासाठी व आमच्या कंपनीचे अर्थिक नुकसान व्हावे या हेतुने त्यांनी जाणीवपुर्वक आपसात केलेल्या कराराचा कोणतीही पुर्व सुचना फिर्यादी यांचे कंपनीस न देता कराराचा भंग केलेला आहे. तसेच यमुनानगर भागातील ५३० इंटरनेट कनेक्शन हेतुपुर्वक सिस्टममधे बिघाड करून बंद केले तसेच त्यांनी फिर्यादी यांना धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. देवेंद्र चव्हाण ८०८७७९६६११ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ६७४/१७,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | रविंद्र सकपाल,वय ५३ वर्षे, रा.चिखली रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/११/२०१७ रोजी सायं.१८/४५ वा.चे सुमारस सीएनजी गॅस पंपाचे अलिकडे जाधव वाडी, चिखली,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे ॲक्टीव्हा गाडी थांबवुन नमुद ठिकाणी लघुशंकेसाठी गेले असता, व फिर्यादी यांची पत्नी गाडी जवळ थांबली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांच्या पत्नीची नजर चुकवुन ॲक्टीव्हा गाडीला लटकवलेली सोन्याच्या दागिन्याची पिशवी एकुण १ लाख ६२ हजार रु.किंमतीची फिर्यादी यांचे समतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भोये ९९६९४२९७२८ |

## दि.२९/०९/१६७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | सांगवी | भादविक ४२०,४०६,४६७,४६८,४७१ | सुनिल पुरुषोतम यादव | ३० |
| २ | विश्रामबाग | भादविक ४५४,४५७,३८०,३४ | अक्षय लक्ष्मण साळुंखे | ३४ |
| ३ | विश्रामबाग | भादविक ४५४,४५७,३८०,३४ | राजु शंभु देवनाल | १९ |
| ४ | पिंपरी | भादविक ३९५,४२७,आर्म ॲ.क.४(२५) | ओंकार किशोर कुटे | २१ |
| ५ | समर्थ | भादविक ३०७,३२६,३२३,५०४,५०६,४२७,३४ | अजीत अशोक रणदिवे | २४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**